महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १५४ वे | दिनांक : २८/०५/२०२६ | वार : गुरूवार

## चित्रपट दिग्दर्शकाचा छतावरून पडून मृत्यू - २ राष्ट्रीय पुरस्कार मिळाले होते



बंगाली चित्रपट दिग्दर्शक अनिक दत्ता यांचे बुधवारी कोलकाता येथे निधन झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ते दक्षिण कोलकाता येथील त्यांच्या बहुमजली घराच्या छतावरून खाली पडले होते. त्यांना तात्काळ ढाकुरियाजवळील एका खाजगी रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या घटनेनंतर कोलकाता पोलिसांच्या एका पथकाने प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. दिग्दर्शकाच्या निधनाची बातमी मिळाल्यानंतर श्रीलेखा मित्रा आणि रुद्रनील घोष यांच्यासह बंगाली चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकार रुग्णालयात पोहोचले.

न्यूज एजन्सी पीटीआयनुसार, पोलिसांनी एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, अनिक दत्ता त्यांच्या घराच्या छतावरून संशयास्पद परिस्थितीत पडले होते. तथापि, त्यांच्या कुटुंबाकडून या प्रकरणी अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन आलेले नाही.पोलिस घटनास्थळी पोहोचून बारकाईने तपास करत आहेत. त्यांच्या अशा अचानक जाण्याने बंगाली चित्रपटसृष्टीतील लोक हैराण झाले आहेत. अभिनेत्री श्रीलेखा मित्रा, रुद्रनील घोष आणि अरिंदम सिल रुग्णालयाच्या बाहेर दिसले, जे दिग्दर्शकाला अखेरचा निरोप देण्यासाठी पोहोचले होते.

अनिक दत्ता यांना २०१२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'भूतेर भविष्यत' या हॉरर-कॉमेडी चित्रपटातून चित्रपटसृष्टीत मोठी ओळख मिळाली होती. या चित्रपटात हॉरर कथेसोबतच राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेवर कठोर टीका करण्यात आली होती. बंगाली चित्रपटसृष्टीत हा चित्रपट एक मैलाचा दगड मानला जातो.

या चित्रपटात स्वास्तिका मुखर्जी, पराश बंदोपाध्याय, सब्यसाची चक्रवर्ती, परमब्रत चॅटर्जी आणि शाश्वत चॅटर्जी यांसारख्या कलाकारांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. त्यानंतर त्यांनी 'आश्चर्य प्रदीप' आणि 'मेघनाद बध रहस्य' यांसारख्या चित्रपटांचे दिग्दर्शनही केले होते.

चित्रपटाच्या निर्मितीच्या कथेवर आधारित 'अपराजितो' नावाचा चित्रपट बनवला होता. या बायोग्राफिकल ड्रामा चित्रपटाला 2024 मध्ये दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले होते. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट मेकअप (सोमनाथ कुंडु) आणि सर्वोत्कृष्ट प्रोडक्शन डिझाइन (आनंद आध्या) साठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता.

राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यावर अनिक दत्ता यांनी हिंदुस्तान टाइम्सशी बोलताना सांगितले होते की, ते स्वतः ज्युरीमध्ये होते आणि त्यांना माहित आहे की निर्णय कसे घेतले जातात. त्यांनी त्यांचे क्रू मेंबर्स सोमनाथ आणि आनंद यांच्या कठोर परिश्रमाचे कौतुक केले होते.

दिग्दर्शक अनिक दत्ता यांचा शेवटचा दिग्दर्शित चित्रपट 'जतो कांडो कोलकातातेई' २०२५ साली दुर्गा पूजेच्या मुहूर्तावर चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला होता. हा एक हेरगिरीवर आधारित रहस्यमय थरारपट होता. या चित्रपटात अबीर चटर्जी, काजी नौशाबा अहमद आणि दुलाल लाहिरी यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. अनिक दत्ता आपल्या चित्रपटांमध्ये सामाजिक संदेश, सस्पेन्स आणि सटायर (व्यंग्य) च्या नेमक्या वापरासाठी ओळखले जात होते.

## सुनेत्रा पवार यांची कोणतीही नाराजी नाही मुख्यमंत्र्यांचे स्पष्टीकरण





**मुंबई :** तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात मोठे बदल झाले असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सूत्रे आणि राज्याचे उपमुख्यमंत्रिपद त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्याकडे आले आहे. सध्या पक्षवाढीसह स्वतःचे नेतृत्व सिद्ध करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. मात्र, उपमुख्यमंत्रिपद मिळूनही अजितदादांकडे असलेले महत्त्वाचे अर्थखाते अद्याप सुनेत्रा पवार यांना देण्यात आलेले नाही. अर्थखाते न मिळाल्यावरून सुनेत्रा पवार यांनी नुकतीच नाराजी व्यक्त केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली असून, याच पार्श्वभूमीवर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्यासह राज्यातील मंत्री तसेच अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने आज दिल्ली दौऱ्यात केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांची भेट घेऊन कांदा प्रश्नावर महत्त्वपूर्ण चर्चा केली. या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना, सुनेत्रा पवार यांनी अर्थखात्यावरून व्यक्त केलेल्या कथित नाराजीबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारला असता, फडणवीस यांनी स्पष्ट केले की, अद्याप तरी माझ्यापर्यंत त्यांची कोणतीही नाराजी आलेली नसून, त्या जेव्हा स्वतः याविषयी माझ्याशी बोलतील, तेव्हाच मी यावर माझे मत व्यक्त करेन, असे म्हटले आहे.

२६ मे रोजी मुंबईत पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महत्त्वपूर्ण बैठकीत अर्थखात्याच्या वाटपावरून सविस्तर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. अजितदादांच्या काळात राष्ट्रवादीकडे असलेले हे महत्त्वाचे खाते आता पक्षाला परत मिळाले नसल्याची खंत सुनेत्रा पवार यांनी या बैठकीत व्यक्त केल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या या कथित नाराजीचे पडसाद आता राजकीय वर्तुळात उमटू लागले असून, 'अद्याप माझ्यापर्यंत अशी कोणतीही नाराजी आलेली नाही,' असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. त्यामुळे अर्थखात्याच्या या मुद्द्यावरून आगामी काळात राज्याच्या राजकारणात काय घडामोडी पाहायला मिळतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

दरम्यान, आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत विधानपरिषदेच्या निवडणुकांच्या विषयावर चर्चा झाली. त्यावर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले, १७ जागांसाठी महायुतीमधील जागावाटपाचा तिढा जवळपास सुटला असून, केवळ दोन ते तीन जागांवर अंतिम निर्णय होणे बाकी असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, विधानपरिषद निवडणुकीबाबत मी पुन्हा सांगतो, आमचे जवळपास ॲग्रीमेंट झालेले आहे. फक्त शिवसेनेसोबत नाशिक आणि संभाजीनगर येथील जागा आम्हाला मिळाली पाहिजे हा आमचा आग्रह आहे. राष्ट्रवादीने आमच्याकडे पुण्याची जागा मागितली आहे, सध्या याच गोष्टींवर आमचे आडले आहे, जे आम्ही सोडवून घेऊ. तसेच कठीण पेपर संपलाय, आता सोपा पेपरही आम्ही सोडवून घेऊ, टिकमार्क करायचे बाकी आहे, ते होऊन जाईल, असे फडणवीस म्हणाले.

## अजितदादांनी 'देवराई'साठी शब्द दिला होता:पण आताचे आमदार फोनही उचलत नाहीत, अभिनेते सयाजी शिंदेंनी व्यक्त केली खंत



**मुंबई :** रस्ते रुंदीकरणाच्या नावाखाली होणाऱ्या बेसुमार वृक्षतोडीवर आणि प्रशासकीय अनास्थेवर तीव्र संताप व्यक्त करताना, मला कोणाच्या भ्रष्टाचारात किंवा प्रोटोकॉलमध्ये रस नसून केवळ झाडे जगवण्यात रस आहे, अशी रोखठोक भूमिका अभिनेते व सह्याद्री देवराईचे प्रणेते सयाजी शिंदे यांनी एका विशेष मुलाखतीत मांडली. या समस्येवर केवळ नाराजी न दर्शवता त्यांनी साताऱ्यात 'झाडांच्या अनाथ आश्रमा'ची स्थापना केली असून, याच अभिनव उपक्रमाच्या माध्यमातून आता संपूर्ण महाराष्ट्रभर वृक्षसंवर्धनाची आणि झाडे वाचवण्याची एक नवी, व्यापक चळवळ उभारण्याचा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. यावेळी बोलताना त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवारांची एक आठवणही सांगितली आहे.

मुलाखतीमध्ये बोलताना सयाजी शिंदे म्हणाले, अजितदादांच्या मध्ये राजकारणात जेवढा धूर्तपणा लागतो तेवढा होता. पण काम करण्यासाठी जो मोकळेपणा लागतो तो सर्व होता. माझे दोन-तीन अनुभव होते, जी कामे सांगितली ती पूर्ण झाली. अधिकाऱ्यांना जाब विचारण्याची पद्धत बाकीच्यांमध्ये आहे का नाही मला माहीत नाही. पण अजितदादांमध्ये ती होती. त्यावेळी मला दादांनी सांगितले होते की तुमच्या झाडांच्या चळवळीसाठी तुम्ही जर माझ्या पक्षात आला तर तुमचे काम अधिक सोपे होईल. सध्या आमच्या पक्षाची परिस्थिती ठीक नाही. यावेळी तुम्ही जेवढे आमदार निवडून द्याल तेवढे देवराई करू, असा शब्द अजितदादांनी दिला होता, पण अचानक ते गेले.

पुढे बोलताना सयाजी शिंदे म्हणाले, आता मी आमदारांना संपर्क करतोय, पण माझे ते फोन उचलत नाहीत. किंवा जेवढा सपोर्ट करणे गरजेचे आहे तेवढे होत नाही. हा महाराष्ट्राचा दुर्दैवाचा भाग आहे. देवगिरी ते देवराई हा प्रकल्प राबवण्याचा माझा विचार आहे. हा प्रकल्प मी सर्व आमदारांना दाखवणार आहे. किमान १० हजार झाडे ४० आमदारांनी लावणे अपेक्षित आहे.

सयाजी शिंदे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीचाही एक किस्सा सांगितला. ते म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एकदा भेटण्याचा योग आला होता. त्यावेळी साताराचे तात्कालीन पोलिस अधीक्षक समीर शेख हे सहकार्य करत नसल्याचे सांगितले होते.

पुढे सयाजी शिंदे म्हणाले, एकनाथ शिंदे यांच्या विषयी जे बाहेर ऐकले जाते त्याचा मला नक्कीच अनुभव घ्यायचा आहे. कारण मला धाडसासाठी सपोर्टची खूप गरज आहे. याबाबत मी त्यांना लवकरच भेटून झाडांबाबत सहकार्य करण्याची विनंती करणार आहे. खरंतर एकनाथ शिंदे आणि मी स्वतः एकाच भागातील आहोत. साताऱ्यातील अकरा हिरे ज्यावेळेस आमचा सन्मान झाला होता त्यावेळेस आम्ही दोघे एकत्र आल्यावर एकनाथ शिंदे मूळचे सातारचे आहेत हे मला समजले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २८ मे २०२६

## छ. संभाजीनगर विभागातील ६६ परीक्षा केंद्रावर मुक्त विद्यापीठाच्या परिक्षांना सुरूवात : गैरप्रकार रोखण्यासाठी आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर



**छत्रपती संभाजीनगर :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्यूत्तर शिक्षणक्रमाच्या परिक्षांना आज (दि.२७मे) पासून सुरूवात झाली. छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्रांतर्गत येणाऱ्या छ. संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव जिल्ह्यातील एकुण १८० अभ्यासकेंद्रावरील ४९ हजार विद्यार्थी ६६ परिक्षा केंद्रावरून परिक्षा देत आहेत. या परिक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी विद्यापीठाने आधूनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला असल्याची माहिती विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्राचे संचालक डॉ. नंदकुमार राठी यांनी दिली. या संदर्भात अधिक माहिती देताना विभागीय संचालक डॉ. नंदकुमार राठी म्हणाले की, परिक्षा अधिकाधिक पारदर्शक, सुरक्षित, गैरप्रकार मुक्त वातावरणात घेण्यासाठी माननीय कुलगूरू डॉ. संजीव सोनवणे आणि प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली ए.आय. आधारित सीसीटीव्ही यंत्रणेचा वापर आम्ही करीत आहोत. अशा प्रकारचा हा राज्यातील पहिलाच प्रयोग आहे. कॅमेऱ्याचे नियंत्रण विभागीय केंद्रासह विद्यापीठ स्तरावरही असणार आहे. प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही असेल त्या सह सर्व परिक्षा केंद्रावरील प्रश्नपत्रिका डाऊन लोड कक्षात आणि उत्तरपुस्तिका सील केल्या जातात. त्या कक्षात सीसीटीव्ही असणार आहेत. या दोन्हीवेळी बहिस्थ पर्यवेक्षक उपस्थित राहणे बंधनकारक राहणार आहे. २७ मे ते १२ जून या कालावधीत होणाऱ्या या परिक्षांसाठी छत्रपती संभाजीनगर विभागातून ४९ हजार विद्यार्थी परिक्षा देत आहेत. यामध्ये सर्वाधिक १७,९९२ विद्यार्थी बी.ए. अभ्यासक्रमाचे आहेत. विज्ञान शाखेतील ३९९८परिक्षार्थी असून बीड जिल्ह्यात २४, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १९, जालना जिल्ह्यात १४ तर धाराशिव जिल्ह्यात ९ परिक्षा केंद्रांचा समावेश असल्याचे डॉ. नंदकुमार राठी यांनी सांगितले.

## वादळी वाऱ्याचा तडाखा; शेतकऱ्यांच्या सोलार यंत्रणेचे मोठे नुकसान



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** शनिवारी सायंकाळी परभणी जिल्ह्यात काही ठिकाणी झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी सोलार पॅनलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील सोलार प्लेट उडून गेल्या तर काही ठिकाणी लोखंडी संरचना कोसळल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.विशेषतः शेतीपंपासाठी बसविण्यात आलेल्या सोलार यंत्रणांना मोठा फटका बसला असून अनेक ठिकाणी पॅनल तुटल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला आहे. काही ठिकाणी झाडे आणि फांद्या सोलार प्लेटवर कोसळल्यानेही नुकसान झाले. यामुळे शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. वादळी वाऱ्यासोबत पावसानेही हजेरी लावल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. अनेक गावांमध्ये वीजपुरवठा काही काळ खंडित झाला होता.

नागनाथ पांडुरंग इखे. यांच्या गट नंबर. ८९४. झरी शिवारातील सोलार पॅनल कोसळून नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी प्रशासनाने पंचनामे करून तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय महा प्रशिक्षण अभियान मुंबईत संपन्न




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** भारतीय जनता पार्टी परभणी जिल्हा ग्रामीणच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पंडित दीनदयाळ उपाध्याय महा प्रशिक्षण अभियान मुंबई येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, केशव सृष्टी येथे आज उत्साहात संपन्न झाला. पक्षाच्या वैचारिक अधिष्ठानावर आधारित या प्रशिक्षण अभियानात कार्यकर्त्यांना राष्ट्रवाद, संघटन कौशल्य व समाजकेंद्रित विकासाच्या संकल्पनांवर मार्गदर्शन करण्यात आले.प्रशिक्षण अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री मेघना साकोरे -बोर्डीकर, प्रदेश उपाध्यक्ष संजय कोडगे, प्रदेश सरचिटणीस रवी अनासपुरे, जिल्हा प्रभारी आमदार संजय केणेकर तसेच जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, मार्गदर्शन म्हणून महिला प्रदेशच्या भोसले ताई, वाघताई, दुसऱ्या दिवशी मंत्री गिरीश महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पंडित दराडे यांनी केले.अभियानाच्या पहिल्या सत्रात ज्येष्ठ विचारवंत वर्षा भोसले ताई, भैरवी वाघ, डॉ. विजय सहस्त्रबुद्धे यांनी "आपले सैद्धांतिक अधिष्ठान — एकात्म मानव दर्शन, सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि पंचनिष्ठ" या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. भारतीय विचारसरणी, राष्ट्रनिर्माण आणि समाजकेंद्रित विकास या विषयांवर त्यांनी विशेष प्रकाश टाकला.डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी सांगितले की, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेले 'एकात्म मानव दर्शन' हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासावर आधारित आहे. माणूस हा केवळ आर्थिक घटक नसून शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांचा समतोल विकास आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाश्चिमात्य भांडवलशाही आणि साम्यवादाला पर्याय म्हणून भारतीय जीवनमूल्यांवर आधारित ही विचारसरणी मांडण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेवर भाष्य करताना भारताची ओळख ही केवळ भौगोलिक सीमांमुळे नसून हजारो वर्षांच्या संस्कृती, परंपरा, अध्यात्म, भाषा आणि सामाजिक मूल्यांमुळे निर्माण झाल्याचे प्रतिपादन करण्यात आले. विविधतेत एकता ही भारतीय संस्कृतीची मोठी ताकद असून राष्ट्रभावना अधिक मजबूत करण्यासाठी सांस्कृतिक एकात्मता आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.तसेच पंचनिष्ठ या तत्त्वांमध्ये राष्ट्रनिष्ठा, लोकशाही, सर्वधर्म समभाव, सामाजिक समरसता आणि मूल्याधिष्ठित राजकारणाचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.

समाजहित, पारदर्शकता आणि राष्ट्रसेवा या मूल्यांवर आधारित कार्यपद्धतीच देशाला प्रगतीच्या दिशेने नेऊ शकते, असे प्रतिपादनही करण्यात आले.या प्रशिक्षण अभियानास जिल्हा परिषद अध्यक्ष लताताई वाकळे, प.स. अध्यक्ष यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २८ मे २०२६


# खानदेशासाठी आनंदाचा क्षण, गुगलवर अहिराणी भाषेस मान्यता



**जालना :** खानदेशी बोली-अहिराणी भाषेला जागतिक स्तरावर नवी ओळख गुगलने मिळवून दिली आहे. आता अहिराणी भाषेला अधिकृत मान्यता दिलेली आहे, यामुळे आता अहिराणी भाषा गुगल कीबोर्ड वर सर्च करून टाईप करता येणार आहे. अहिराणी मधून संदेश पाठवता येईल.डिजिटल माध्यमातून खानदेशची अहिराणी मायबोलीला स्थान निर्माण झालेले आहे. खानदेशी बोली ही जळगाव, धुळे नंदुरबार, मालेगाव, तसेच नाशिक, छत्रपती संभाजी नगर, जालना,व बुलढाणा जिल्ह्याच्या सीमावरती भागामध्ये मोठ्या प्रमाणावर बोलली जाते, मध्य प्रदेश व गुजरातच्या सीमावरती भागामध्ये ही अहिराणी भाषिक मोठ्या प्रमाणावर दिसतात.प्राचीन काळात अहिर लोकांची भाषा अहिराणी होती, अर्वाचीन काळामध्ये अहिराणी नावाने ती प्रसिद्ध झाली. अहिराणी ही फक्त बोली नसून खानदेशच्या संस्कृतीच्या ,लोक जीवनाचा आणि परंपरेचा आत्मा व इतिहास मानली जाते ,आजही खानदेशात गाव-खेड्यातील दैनंदिन व्यवहारात, अहिराणी भाषेची लोकगीते, सण, उत्सव, नातेसंबंध आणि लोक संस्कृतीत अहिराणीचा भाषेचा गोडवा आजही टिकून आहे. आता गुगल सारख्या जागतिक तंत्रज्ञान मंचावर या बोलीभाषेला स्थान मिळाल्याने तिच्या जतन व संवर्धनाला मोठी चालना मिळणार आहे. या यशामागे जागतिक अहिराणी भाषा संवर्धन परिषद, उत्तर महाराष्ट्र खानदेश विकास मंडळ, विविध सामाजिक, सांस्कृतिक संस्था, साहित्यिक ,कवी लेखक ,संशोधक व विद्यार्थी यांनी तसेच अहिराणी भाषा प्रेमींनी, अनेक वर्ष प्रयत्न व संघर्ष करून अहिराणी भाषेला गुगलच्या मंचावर ,जागतिक पातळीवर न्याय मिळवून दिलेला आहे ,अनेक वर्षांपासून विविध माध्यमातून अहिराणी भाषा जिवंत ठेवण्यासाठी सातत्याने कार्य करण्यात येत असल्याचे खानदेश मित्र मंडळाचे जालना जिल्हा अध्यक्ष प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी सांगितले. गुगल वरील मान्यतेमुळे नव्या पिढीला अहिराणी भाषेशी जोडण्यास मदत होणार आहे, या भावनेतून आता अहिराणी अधिक अभिमानाने बोलली, लिहिली, आणि जपली जाईल ,अशी भावना खानदेश मित्र मंडळा तर्फे व्यक्त होत आहे.

गुगलच्या या निर्णयाचे जालन्यातील खानदेश मित्र मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. शशिकांत पाटील, प्रा.डॉ. सुशांत देशमुख,प्रा.अरविंद महाजन, श्री. बाबाजी साळुंखे, श्री. वसंत भामरे, सौ. वैशाली भामरे, श्री. मोरेश्वर पाटील, श्री. दिलीप देशमुख, माजी नगरसेवक डॉ. सुभाष पाटील. पोलीस निरीक्षक श्रीकांत पाटील, विधीतज्ञ मिलिंद देशमुख, श्री. खैरनार, श्री . बळवंत पवार, श्री. दीपक पाटील, आदींनी स्वागत केले आहे.






# ऊस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्याविविध प्रश्नांची केंद्र सरकारकडून दखल



**नवी दिल्ली, बीड -भगवंत पाळवदे :** दि. 27: साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचे ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत आज झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.नवी दिल्ली येथे आज महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात श्री. शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची सकारात्मक चर्चा झाली. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी हेही या बैठकीस उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले, खा. धनंजय महाडिक, आ. दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ राहुल आहेर, विनय कोरे, राहुल कुल, अभिमन्यु पवार, विनय कोरे, राजेश टोपे, राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, राज्य सहकारी साखर महासंघाचे जयप्रकाश दांडेगावकर, रणजितसिंह निंबाळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे , साखर आयुक्त संजय कोलते आधी या बैठकीस उपस्थित होते.या बैठकीत झालेल्या सविस्तर चर्चेतील मुद्द्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली. साखरेच्या प्रश्नांवर केंद्रीय सहकार मंत्र्यांसोबत अत्यंत सकारात्मक चर्चा झाल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले, साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणे गरजेचे असल्याचे श्री. शाह यांनी मान्य केले आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य सरकारसोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यासह व्याज सवलतीचे (इंटरेस्ट सबव्हेंशन ) पैसे तात्काळ देण्याचे मान्य करण्यात आले करण्यात आले आहे. 'क्वेल प्राइजिंग' ( किंमत नियंत्रण) संदर्भात केंद्राने एक प्रस्ताव मागवला असून, राज्य सरकारकडून तो तयार केला आहे व लवकरच सादर केला जाईल. या प्रकल्पामुळे साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल.कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवरही सकारात्मक निर्णय झाले असल्याची माहिती देऊन मुख्यमंत्री म्हणाले, नाफेड आणि एनसीसीएफने सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात थेट व्यापाऱ्यांकडून न होता, थेट शेतकऱ्यांकडून केली पाहिजे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. २ लाख टनांऐवजी १० लाख टन कांदा खरेदी नाफेड आणि एनसीसीएफने करावी, यावर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे. सध्या कांद्याचे बियाणे मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्याने देशांतर्गत कांद्याला एक्सपोर्ट मार्केट उरत नाही. यासाठी कांदा बियाण्यावर मोठ्या प्रमाणात 'एक्सपोर्ट सरचार्ज' लावला पाहिजे, ही मागणी देखील मान्य करण्यात आली आहे. तसेच कांद्याचा खरेदी भाव नुकताच वाढवून १५ रुपये ८० पैसे करण्यात आला आहे. तो आणखी कसा वाढवता येईल यावर चर्चा झाली. कांद्याच्या बियाणांवर निर्बंध असले, तरी कांद्याच्या निर्यातीवर (कांदा पाठवण्यावर) कोणतीही बंदी नाही, असे या चर्चेत स्पष्ट करण्यात आले. नाफेड किंवा एनसीसीएफमध्ये ग्रेडिंगच्या नावाखाली माल निकृष्ट दर्जाचा दाखवून खरेदी नाकारली जाते, अशी शेतकऱ्यांची तक्रार असते. यावर उपाय म्हणून आता यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून ग्रेडिंग केले जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळणार असल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले,आंबा आणि हापूस आंब्यासंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनाही यावेळी निवेदन देण्यात आले. विमा कंपन्यांनी घातलेल्या जाचक अटींमध्ये बदल केल्यास आंबा उत्पादकांना मोठा दिलासा मिळू शकतो, हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले.यावर केंद्रीय मंत्र्यांनी विमा कंपन्यांची बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्याचे आश्वासन दिले असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली .

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २८ मे २०२६

# नाशिक रोड कॅम्प केंद्रीय विद्यालयाच्या तिरंदाजांनी गोव्यात मारला नेम




**नाशिक रोड (प्रतिनिधी) :** गोवा येथे झालेल्या ऑल इंडिया इंडोअर आर्चरी चॅम्पियनशिपमध्ये तोफखाना केंद्र परिसरातील पीएमश्री केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्पच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. विविध वयोगटांत शाळेने दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदकासह एकूण ७० हजार रुपयांची रोख पारितोषिके पटकावली.पदक विजेते विद्यार्थी:- मानस अमोल पाटील, इयत्ता ३ री — सुवर्ण पदक व २०,००० रु. रोख-सानवी सोपान गवळी, इयत्ता ६ वी — सुवर्ण पदक व ३०,००० रु. रोख - अर्णव विजय शिंदे, इयत्ता १० वी ब — रौप्य पदक व २०,००० रु. रोखदेशभरातील नामांकित तिरंदाजांशी स्पर्धा करताना तिघांनीही अचूक नेमबाजी आणि संयमाचे दर्शन घडवले. शाळेचे प्राचार्य गजराज मीना , प्रशासकीय प्रभारी उज्ज्वला चांदोरकर, क्रीडा शिक्षिका कल्पना शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

"विद्यार्थ्यांची मेहनत, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाले. या विद्यार्थ्यांनी शाळेसाठी नवा आदर्श निर्माण केला आहे," असे प्राचार्य मीना म्हणाले. या विजेत्या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# ......ह्याचसाठी केला होता अट्टाहास!

साहित्य सृजन, सज्जनहो,सस्नेह नमस्कार.गेल्या दीड वर्षा पूर्वी मी समीक्षणार्थ अलीकडे प्रकाशित झालेले पुस्तकं पाठविण्यासाठी आवाहन केले होते आपण माझ्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला, नवागतांसह प्रसिद्ध ज्येष्ठ लेखक कवींनीही विश्वास व्यक्त केला, आजवर आलेल्या पैकी ११३ पुस्तकांचे समीक्षण केले . त्याचीं अनेक वृत्तपत्रांनी दखल घेतली व प्रसिद्धीही दिली. सर्व संपादक, वार्ताहर,वृत्तप्रतिनिधी व लेखक,कवी, साहित्यिक बंधु-भगीनींचे मनापासून आभार!!!हाच लोभ, जिव्हाळा, आपुलकीचा अनुबंध यापुढेही असू द्या .*माझ्या समीक्षणावर अनेक मित्रांनी मनापासून निरपेक्ष अभिप्राय नोंदलवा . भ्रमणध्वनी वर संपर्क साधून लेखनाविषयी आस्थेने चर्चाही केली. त्यामुळे इथंवर आलो सर्वांना धन्यवाद!!!लवकरच नवोम्मेषी साहित्य समीक्षा हा ग्रंथ प्रकाशित करण्याचा मानस आहे.) काही निवडक नामावली.... १)स-समीक्षेतला-विद्रोही कविता संग्रह (संपादन- प्रा ज्योती देसाई, पुणे)0२) वात्सल्य सिंधू आई -प्रातिनिधीक काव्यसंग्रह (संपादन -डॉ नरेंद्र खेरनार, साक्री)३) शेलक्या बारा -कथासंग्रह(प्रा इंद्रजित पाटील, धाराशिव)४) स्वयं प्रकाशित व्हायचंय मला - काव्यसंग्रह( प्रणालि मराठे,धळे)५) चंद्रकला -कादंबरी(राजाराम जाधव, मुंबई)६)जागरण-आत्मचरित्र (भारत सातपूते , लातूर)७) शब्दफुले -काव्यसंग्रह(प्रा पंढरीनाथ बनसोडे, नागपूर)८)सत्यार्थ दीपिका- काव्य संग्रह (सौ मंगलाताई रोकडे, एरंडोल)९)पान हिरवे या मनाचे -गझलसंग्रह(काशिनाथ महाजन, नाशिक)१०)कळ पोटी आली ओठी -काव्यसंग्रह, अष्टाक्षरी (प्रा इंद्रजित पाटील, धाराशिव)११) माझ्या अंगात येऊ दे -कथासंग्रह(प्रा सुभाष पाचारणे, पुणे)१२) ताटातूट -कथासंग्रह(गोकुळ गायकवाड, लातूर)१३) अस्तित्व -कथासंग्रह(, शिवराज सगळे, अहमदनगर)१४) फक्त तुझ्याचसाठी -काव्य, चारोळी (संजय गायकवाड, नागपूर)१५)ऑल इज वेल -वैचारिक लेख (प्रा विनय मिरासे, यवतमाळ)१६) कन्यादान -कादंबरी( प्रा प्रिती. योसेफ बनकर, वैजापूर)-१७)--प्रक्षोभ -डॉ. शिवाजी (, आत्मचरित्र))१८/) डॉ शिवाजी जाधव ---तिम्मा (कादंबरी)..........तेआजपर्यंत" दुष्टचक्र" कथासंग्रह हे ११३ वे समीक्षण .*१० साहित्य कृतींचे समीक्षण प्रकृती ठीक नसल्याने पेंटिंग*आपले साहित्य समीक्षणार्थ स्नेहपूर्वक पाठवा स्नेहाभिलाषि विद्रोही कवी साहेबराव मोरे, ज्येष्ठ समीक्षक चाळीसगाव संवाद - ९४०४०४८६०१

**साहेबराव मोरे**
२५/अ. श्रद्धेय टॉवर
सुवर्णा मार्ग शास्त्रीनगर
चाळीसगाव
जिल्हा जळगाव पिन४२४१०१

# जयभवानीच्या कु. आयशा शेख हीची महाराष्ट्र पोलीस मध्ये निवड



**पाटोदा (प्रतिनिधी)** दि. २६ मे : पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयाची चुंभळी येथिल विद्यार्थीनी कु.शेख आयशा अन्सार हीची नुकतीस महाराष्ट्र पोलीस मध्ये निवड झाली आहे. कु. आयशा शेख ही हुशार व मेहनती विद्यार्थीनी होती. तिच्या निवडी बद्दल तिचे वडिल शेख अन्सार यांचा महाविद्यालयात प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या शुभहस्ते शाल पुष्पगुच्छ व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी कु. आयशा शेख व तिचे पालक यांचे अभिनंदन करून भविष्यासाठी शुभेच्छा! दिल्या या प्रसंगी ह.भ.प. अप्पासाहेब घुमरे, अॅड.नाईकनवरे,श्री.दत्ता पवार यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले तर आभार प्रा. बाळासाहेब जोशी यांनी मानले या प्रसंगी सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.
डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# निधन वार्ता



**दौलताबाद (जावेद अहमद) :** अब्दिमंडी येथील निवृत्त शिक्षक शेख खलीलउर रहेमान रा.अब्दीमंडी (७९) यांचे अल्पशा आजाराने दि २७ बुधवारी सकाळी निधन झाले त्यांचा दफनविधी अब्दीमंडी येथील दायरा कबरस्तान मध्ये करण्यात आला त्याच्या पश्चात एक मुलगा,सून,एक मुलगी,नातवंडे असा परिवार आहे

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २८ मे २०२६

## कंत्राटदार नावंदर दाम्पत्यावर 'अॅट्रॉसिटी' दाखल करा; 'बंटी और बबली'ची जोडी गजाआड करण्याची मागणी




**छत्रपती संभाजीनगर (विशेष प्रतिनिधी):** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील ऐतिहासिक 'नामांतर शहीद स्मारक' उभारणीच्या कामात कोट्यवधी रुपयांचा निधी हडप करून अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या आणि जातीय द्वेष पसरवणाऱ्या कंत्राटदार प्रियंका रोहित नावंदर व रोहित नावंदर यांच्यावर 'अॅट्रॉसिटी अॅक्ट'नुसार तात्काळ गुन्हा दाखल करावा, या मुख्य मागणीसाठी 'महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षा'चे जिल्हाध्यक्ष राहुल जी. वडमारे यांनी स्वतः सोमवार, दिनांक २५ मे २०२६ पासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) अधिक्षक अभियंता कार्यालयासमोर (स्नेहनगर, छत्रपती संभाजीनगर) 'जीव जाईपर्यंत आमरण उपोषण' सुरू केले आहे.महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे पक्षप्रमुख मा. संजय (भैय्या) सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन सुरू करण्यात आले असून, आंबेडकरी आणि भारतीय संविधानाला मानणाऱ्या सर्व जनतेमध्ये या भ्रष्टाचारामुळे तीव्र संतापाची लाट उसळली आहे.'बंटी और बबली'च्या जोडीने केला महापुरुषांचा अवमान: राहुल वडमारेउपोषणकर्ते जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लक्षावधी अनुयायांचे श्रद्धास्थान असलेल्या नामांतर शहीद स्मारकाच्या भव्य उभारणीचे कंत्राट प्रियंका रोहित नावंदर यांच्या एजन्सीला देण्यात आले होते. मात्र, कंत्राटदाराने जातीय द्वेष आणि नफेखोरीच्या मानसिकतेतून तब्बल चार वर्षे उलटून गेल्यानंतरही स्मारकाचे काम पूर्ण केलेले नाही. सद्यस्थितीत जे काही काम झाले आहे, ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. या भ्रष्टाचारी कंत्राटदार नवरा-बायकोची जोडी म्हणजे 'बंटी और बबली' असून, त्यांनी शासनाची फसवणूक करून तमाम आंबेडकरी जनतेच्या भावना दुखावल्या आहेत. हा भ्रष्टाचार महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष कधीही सहन करणार नाही.निवेदनाद्वारे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्या:1. अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करा: नामांतर शहीद स्मारकाचे काम जाणीवपूर्वक रखडवणारे आणि निकृष्ट काम करणारे कंत्राटदार रोहित नावंदर व त्यांच्या पत्नी प्रियंका रोहित नावंदर यांच्यावर तात्काळ अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार (Atrocity Act) गुन्हा नोंदवून अटक करावी.2. फॉरेन्सिक लॅब (Forensic Lab) मार्फत चौकशी करा: प्रियंका रोहित नावंदर या एजन्सीने सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये (PWD) आतापर्यंत जेवढी कामे केली आहेत, ती सर्व कामे बोगस कागदपत्रे लावून व स्वतःच्या पत्नीच्या खोट्या सह्या करून मिळवलेली आहेत. त्या सर्व कामांची फॉरेन्सिक लॅब (Forensic Lab) मार्फत एक विशेष कमिटी नेमून सखोल तपासणी करण्यात यावी.3. नवीन निविदेवर (Tender) बंदी घाला: कंत्राटदार प्रियंका रोहित नावंदर या एजन्सीला वरील सर्व चौकश्या पूर्ण होईपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागातील (PWD) कोणत्याही नवीन निविदेत (Tender) भाग घेऊ देऊ नये.4. लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (ACB) चौकशी व मालमत्ता जप्ती: प्रियंका रोहित नावंदर या एजन्सीने व रोहित नावंदर यांनी कामांच्या नावाखाली शासनाची केलेली फसवणूक आणि सा.बां. विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांना हाताशी धरून कमावलेल्या सर्व अवैध मालमत्तेची 'लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून' (Anti-Corruption Bureau) सखोल तपासणी करून गुन्हे दाखल करावेत.मागण्या पूर्ण होईपर्यंत माघार नाही!"स्मारकाचे काम जाणीवपूर्वक रेंगाळत ठेवून महापुरुष आणि शहिदांचा अवमान करणाऱ्या नावंदर दाम्पत्याला जोपर्यंत अटक होत नाही आणि त्यांच्या एजन्सीला ब्लॅकलिस्ट केले जात नाही, तोपर्यंत हे आमरण उपोषण मागे घेतले जाणार नाही.रोहित नावंदर यांचे शहरातील राजकीय व गुंड प्रवृत्तीच्या लोकांशी हितसंबंध असल्यामुळे उपोषणादरम्याण माझ्या जीविकास कोणतीही हानी झाल्यास, त्याची संपूर्ण कायदेशीर व नैतिक जबाबदारी प्रियंका रोहित नावंदर या एजन्सीवर व सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) आणि प्रशासनाची राहील," असा कडक इशारा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे यांनी दिला आहे.

या आंदोलनाची तीव्रता पाहता अधिक्षक अभियंता कार्यालयाबाहेर भीम सैनिकांची आणि आंदोलकांची मोठी गर्दी जमू लागली असून, विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे.

## महागाईचा उडाला भडका

अच्छे दिनांच्या प्रतीक्षेत,
महागाईचा उडाला भडका.
संसारी माणसांच्या खिशाला,
लागला जबरदस्त तडका. १

जीवनावश्यक वस्तू सारे,
अति महाग झालेत सर्व.
अच्छे दिन येणार म्हणून,
बाळगतो आम्ही बेगडी गर्व. २

पंधरा लाखाच्या प्रलोभनास,
कशी खुंटली आमची मती.
महागाईच्या भडक्याने आता,
संथ झाली विकासाची गती. ३

पंधरा लाखाचे दिवास्वप्न,
भर दिवसा उभ्याने लुटले.
अच्छे दिनांच्या प्रतीक्षेत,
आता महागाईचे वारे सुटले. ४

पेट्रोल, डिझेल ,तेल यांचा,
जबरदस्त उडाला भडका,
संसार करता करता सर्वांचा
महागाईने चेहरा झाला रडका. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## वेंधळी पिंकी

आमची पिंकी
वेंधळी फार
आईचा खायची
उठता बसता मार

वेळेवर कधी
जेवत नसे
आई झोपली की
ताट वाढून बसे

एकदा तर तिची
फजिती झाली
आई बाहेर जाताच
स्वयंपाक घरात गेली

वरण भात खाऊन
बाहेर झाली पसार
घाई गडबडीत
उघडे ठेवले दार

टपून बसलेल्या मांजरीने
फस्त केले दूध दही
एवढ्यात तिथे आली
पिंकीची आई

पिंकीच्या पाठीत मग
बसले धम्मक लाडू
फजिती झाल्याने
फुटले तिला रडू



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## माता रमाई व माईसाहेब यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम

**छत्रपती संभाजीनगर** : माता रमाई आंबेडकर व माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रबुद्ध युवा परिवर्तनवादी विचार मंच आणि अवलोकितेश्र वर प्रॉडक्शन्स यांच्या संयुक्त विद्यामाने परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रा. डॉ. प्रज्ञा साळवे व सेवानिवृत्त प्रा. कीर्तीलता पेटकर याप्रसंगी आपले विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राध्यापिका उज्वला खोब्रागडे असतील हा कार्यक्रम मराठवाडा साहित्य परिषद सभागृह येथे दिनांक २९ मे २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता आयोजित करण्यात आला आहे तरी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित राहावे अशी विनंती रामभाऊ पेटकर आणि प्रकाश त्रिभुवन यांनी केली आहे.

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस**

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २८ मे २०२६

# हेळसांड:-उपेक्षितांच्या वेदना हुंकार कथा




**अ**खंड लिहिता हात म्हणून अनंता सूर यांचा हातखंडा आहे.कथा कादंबरीकार,नाटक,स्वकथन,व संशोधन संपादन ही वाड्मयीन अंगाने साहित्य संपदा. सन्मित्र डॉ.अंनता सूर यांचा "हेळसांड"हा नारायण सूर्वे उत्कृष्ट कथासंग्रह म्हणून दखलपात्र झाला आहे.अनंता सूर यांचीप्रादेशिकतेच्या अंगाने जाणारी कथा मनावर उमटत जाते.या हेळसांड कथासंग्रहात.सोळा लघूउतम कथा आहेत.कथाअंतरंग हा आजकलाचा गावगाडा व गावगाड्या बाहेरील शोषित पिडितांचे जगण्याचे पिळवटून टाकणारे अस्वस्थ व्यथा वेदनेचे हुंकार आणि सर्वहार लोक समुहाचे चित्रण येते.भटक्या विमुक्तांचे वंचित घटकांचे विदारक वास्तव आजच्या समकालीनात ही पाह्यला मिळते.फुले,शाहू,आंबेडकर,तथागत भगवान गौतम बुद्धांची सम्यक विचार धारा पेरण्याचे कार्य या हेळसांड कथासंग्रहात दिसून येते.आजचा माणूस यंत्र युगाचा पाईक झाला आहे.तरी ही वंचितांचे जगणं हे अतिशय खडतरचं आहे.ही जगण्याची हेळसांड अजूनही थांबली नाही.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचें विचार अपर्ण पत्रिकेत.(१५मे.१९३८,देवरूख) येथील भाषण"सर्व जाती,पंथ भेद दूर करून शेतकऱ्यांनी हा लढा जोराने व संघटीतपणे व शिस्तीने लढावा.राजकिय सत्ता,शेटजी,भटजी,सावकार, व्यापारी, जमीनदार भांडवलदारांच्या घशात जाण्यापेक्षा कष्टकरी शेतकरी वर्गांच्या वंचित घटकांच्या हाती गेली पाहिजे "ही संविधान विचार धारा पेरण्याचे काम हेळसांड या कथासंग्रहाने केले आहे.कथेचे अंतरंग मनाचा तळ ढवळूनकाढते.उध्वस्तगाव खेड्यांतील उपेक्षित वंचित घटकांचे भयंकर चित्रण या कथांमध्ये आहे.वचिंत उपेक्षित घटकांची सर्व व्यापक अंगाने जाणारी ही कथा आहे.उपेक्षितांचे अंतरंग सांगतत्यांची कुत्तर ओढ आजही थांबली नाही.स्वांतत्र्य मिळाले पण अजूनही संविधान रूजले नाही.ही सखेद खंत आहे.गाईचे डोळे भर पोळ्याच्या दिवशी एक जाणी गाय पोटात वासरू मेले म्हणून तडफडते.लेखक वावरात जातो.गाईची तडफड पाहतो.मित्राला फोनवर डॉक्टरला घेऊन ये म्हणतो.मित्र आणि डॉ.येतात.तो पर्यन्त मेलेलं वासरू बाहेर पडते.गाईच्या औषध पाण्यासाठी लेखक खिशातले दोन हजार रुपये देतो.मित्र आणि डॉ.गावाकडेगाव पोळ्यासाठी निघून जातात.भटकी कुत्रे मेलेल्या वासराला पळवतात.गाईला सोडून लेखक जात नाही.गाय भरल्या डोळ्यांनी लेखकाला पाहते.फडक्याने गाईचे डोळे पुसतो.तासाभराने गाय उभी रहाते.गाईला पाणी पाजतो.आपण गाईला वाचवले यांचे समाधान लेखकाला वाटते.तो निश्चिंत घरी जातो.दुसऱ्या दिवशी सकाळी शेतात येतो तेव्हा गाय मरून पडलेली असते.रान कुत्र्यांने तिचे पाठीमागून लचके तोडलेले असते.गाईचे डोळे लेखकाला मुक आर्त हाक देतात.लेखकाची घालमेल अस्वस्थ करुन जाते.मित्र व लेखक गाईला खड्यात पुरतात.या कथेतून शेतकऱ्यांची प्राण्यांविषयी भूतदया आत्मिक जिव्हाळाचा भाव प्रकट होतो.अतिसंवेदनशील भाव मनाला व्यथीत करून जातात हे श्रेष्ठत्व या वाड्मयीन मुल्य आहे.या कथाकारांनी दिल्यामुळे कथाकार म्हणून हे अंनता सूर हे नाव श्रेष्ठ आहे.अतिसूक्ष्म भाव कल्लोळ किंवा संवेद भाव संघर्ष यांच्या कथेचा धागा आहे.'टाहो'या कथेत' रमा एक विधवा स्त्री,नवरा दारून मेला.मुलगा एकनाथ वेसनी,मीना कालेज शिक्षण करत चहाची टपरी चालवते.रमा माय.लेखकाला मीनासाठी नवरदेव पाह.ते नात्यातल्या एकुलता एक निर्वेसनी विठ्ठल सोबत लग्न चाळीस हजार रुपये हुंडा देऊन होते.एका आठरोजात तो साप डसून मरतो.मीना तरुणी विधवा होते.वामन मामा हुंड्याचे पैसे परत देतात.पोरीचं लग्न करा.मीना व्हॉट्सॲपच्या जाळ्यात अडकून एका बार्शी कडच्या पोरा बरोबर पळून जाऊन लग्न करू पाहते पण लेखकानी मध्यस्थी करून मंदिरात हार टाकून लग्न करून दिले.महिण्याच्या आत त्यो दारूडा निघाला.मीनाचा छळ करू लागला.एक दिवस मीनानं गळफास घेऊन आत्महत्या केली.रमामाय टाहो फोडून रडू लागली.मी आता कुणासाठी जगू या जगात नवरा, मुलगी,आता कुणीही नाही.पेताड्या पोरगं ही घरी येत नाही.लेखकाचीटाहो ही कथा मन पिळवटून टाकते.या कथा समकालीन ग्रामीण वास्तवाचे अतिशय विदारक चित्रण करणारी कथा आहे."लगन केलं आवडीनन,अन् रडतं बसली सवडीनंअशी सांऱ्याची गत झालेली.पराटीची एकेक झाडं भूईसपाट होतं होती.त्याच्याकडं पाहताना बाच्या डोळ्यात अंधारी आल्यागत वाटत होतं.'जन्मभर अशी कुत्र्यावानी हेळसांड आमच्या वाट्याला का रे देवा?'(पृ.४५)असे चित्रण मनाचा वेध घेते.कोंडी जगण्याची, कोंडी भूकेची, कोंडी भाकरीची.कुठेही चोरी झाली की, संशयित म्हणून ही पारधी जमात पकडून नेयाची.पण या कथेत शेटजी त्यांच्या मुलाबाळांना शाळेत घालतात.अन् इथंच काम करा त्यांना सुखाचा मार्ग देतात.असे देवदुत ही या कथेत आहे.उपेक्षिताच्या जगण्याची कोंडी फोडणारा.'घुसमट'या कथेचं सुत्र जात पात धर्म या युगानुयुगे चालू आहे.पण बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान लिहिले आणि सर्व मानवांला मुक्तीचा मार्ग दाखवला.ही जातीची 'घुसमट' जोपर्यंत जात नाही.तुमची उन्नती नाही."आपल्याला बुध्दाचा, बाबासाहेबांचा देश पाहिजे असेल तर माणसांनी या सर्व जातीभेदातून मोकळे झाले पाहिजे"(पृ.६४)असे समृद्ध सकारात्मक विचारधारेची ही कथा आहे.गावखेड्यात ही परिवर्तनाचे वारे आले आहेत.पण मनातली बंडखोरी जात नाही.उपेक्षितांचा द्वेष करणे थांबले नाही.'बंडखोरी'या कथेतील पोलीस पाटील भीम जयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष असतो.तोचं म्हणतो, आता मी बंडखोरी करणार नाही.कारण तहसीलदार साहेब म्हणाले डॉ बाबासाहेब आंबेडकर हे सर्व भारतीयांचे आहेत.अशी ही परिवर्तनवादी कथा आहे.'बांडगुळ'या कथेतील नायक विजूभाऊ मुस्लिम वस्तीत गॅरेजचं काम करतो.सर्व मुस्लिम मित्र मिळून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर ची जयंती साजरी करतात.पण मिरवणूकीत जातभाईनेच रांडा घातला.मुस्लिम महिलांना मारहाण होते.पोलिस येतात.विजूभाऊ म्हणतो 'नाही साहेब माझ्याचं जात बांडगूळांना तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर कळाले नाही.बाबासाहेब सर्वांचे आहे.पोलीस निघून जातात.लपलेले बांडगूळ जखमी विजभाऊची माफी मागतात.माफ कर भाव खरंच तूच आम्हाला वाचवले.बाबासाहेब वाचले पाहिजे.ते सर्व जातींच्या लोकांचे आहेत.नुसते 'लंचाड'ही कथा बहुरुपी म्हणून आपल्या बापजाद्याचा भिक मागायचा धंदा करतो.महादेवनं सिगारेट ओढली.हा फोटो फेसबुकवर टाकून या कथेतील नायकांने हिंदू धर्माच्या महादेवाचा अपमान केला आहे.आमच्या भावना दुखावल्या.नायकाला पोलिसाचा दणक्या मार भेटतोच.पण बाराशे रुपये आज भिक कमाई झालती.ती पोलिसाला देऊन.कोर्ट कचेरीची झमेलं नको म्हणून सुटका.करून घेतो.घरी मुलगा बाप पुस्तके घेऊन येईल याची वाट पाहतो.नायक घरी येतो बापचे हे सर्व बहुरुपीचं बोचक जाळून टाकतो.नाही आता कुणापुढे ही हात पसरायचे नाही. अनंता सूर यांची कथा उपेक्षितांचे अंतरंग उलगडून दाखवते.'ताटातूट'या कथेतील आशय सुत्र हे विश्ववंदनीय डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या चैत्य भूमीला जाण्याचे आहे.महापरिनिर्वाण दिनानिमित्त गावातील इतर धर्मीय बाया माणसं जातात.मुंबईच्या विविध भागात बाॅंब स्फोट झाल्याने चैत्यभूमीवर जाणारे प्रवासी यांची 'ताटातूट' होते.पण ठाणेदार साहेब या बायकांची व त्यांच्या नवऱ्यांची झालेली 'ताटातूट' व भेट घडवून आणतात.त्यांचे नवरे सुरक्षित आहे.हा मोठा दिलासा या चैत्यभूमीच्या भक्तीना मिळतो.हे प्रमाणिक ठाणेदार अधिकारी स्वतःच्या गाडीत चैत्यभूमीचे दर्शनाला घेऊन जातो.'आधारवड' या कथेत नायक काशीनाथ पाटलांच्या शेतात मोलमजुरी करून एक अंधअपंग मुलीला सांभाळतो.बाप हाच आधारवड असतो.पण पुढे मुलगा सुमीत आपल्या बापाला आधार देतं नाही.ही आजच्या नात्याची गोष्ट आणि पारखं होतं चालेलं रक्ताचं नातं.ही कथा भाष्य करते.'उलंगवाडी'अंकुश पोलिस भरती पास झाल्याची बातमी बापाला दवाखान्यात देतो.पण त्याचं यश ऐकायला या जगात जवळच कुणीच नाही.अशी ही उलंगवाडी मानवी मनाचे मरण या कथेत येते.'दंश', अग्नीपरिक्षा,झळा, झुंज,डोह,या आजच्या समकालीन वास्तवाचे चटके देणाऱ्या कथा आहेत.दि.बा.पाटील यांची प्रस्तावना अतिशय आशय संपन्न.'जगाआणि जगू द्या' हा मानवतेचा एक महान संदेश देणाऱ्या कथा आहेत.मराठी साहित्याच्या दालनात हा कथासंग्रह निश्चितपणे वाचकांच्या पसंतीस उतरलं असा मला आत्मविश्वास वाटतो'तर ख्यातनाम कथाकार योगीराज वाघमारे यांची पाठराखण 'हेळसांड या कथासंग्रहात अपेक्षितांच्या व्यथा, वेदना, मुखर केलेल्या आहेत.अज्ञान, दारिद्र्य,दैव, नशीबाचा फेरा, शिक्षणाचा अभाव, ग्रामीण राजकारण, डावपेच, जातीपातीचे राजकारण तथा अन्य समस्यातून माणूस आजही मुक्त झालेला नाही.याचं वास्तववादी चित्रण म्हणजे 'हेळसांड'कथासंग्रह(पाठराखण)असा हा अतरंग हेलावून टाकणाऱ्या कथा आहेत.दलित, वंचितांच्या वेदनाचा हुंकार या कथा देऊन जातात.



**डॉ प्रभाकर शेळके**
जालना
कवी कथाकार कादंबरीकार
नाट्यलेखक
मो.९९७५१३७३३७

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002